अर्धसाप्ताहिक
# ब्रम्हपुरी समाचार
संपादक : अशोक भैया
RNI No. MAHMUL/2016/69789
E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com
Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25
गुरूवार, दि. ०१ मे २०२५ | वर्ष १० वे | अंक ३८ वा | ब्रम्हपुरी | पाने ६ | किंमत २ रूपये

## आम. वडेट्टीवारांच्या वादग्रस्त विधानाच्या निषेधार्थ फुंकला पुतळा
### छत्रपती शिवाजी महाराज चौकात भाजपची निदर्शने

ब्रह्मपुरी/का.प्र.

२२ एप्रिल रोजी झालेल्या पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यात २६ निष्पाप लोकांचा जीव गेला होता. दहशतवाद्यांनी धर्माबाबत विचारून ओळख पटवून पर्यटकांची हत्या केली. मृत्यूमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांनी केलेल्या दाव्यावर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी प्रश्न उपस्थित केला. दहशतवादी हल्ला करतेवेळी लोकांशी बोलत बसतात का? धर्म विचारत बसतात का? असा सवाल वडेट्टीवारांनी केला. काँग्रेसचे नेते आमदार विजय वडेट्टीवारांनी हिंदूंच्या जखमेंवर मीठ चोळण्याचे काम केले आहे. नीच वक्तव्य करून दहशतवाद्यांना पाठीशी घालण्याचा केविलवाणा प्रयत्न काँग्रेस आमदार विजय वडेट्टीवार यांच्याकडून केला जात आहे.



या विधानाच्या निषेधार्थ भारतीय जनता पार्टी ब्रह्मपुरीच्या वतीने माजी आमदार प्रा. अतुल देशकर यांच्या मार्गदर्शनाखाली काँग्रेस नेते आमदार विजय वडेट्टीवार यांच्या निषेधार्थ फरकड आंदोलन करण्यात आले. ब्रम्हपुरी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात भाजपाच्या कार्यकर्त्यांनी जोरदार निदर्शने करत आंदोलन केले. या वेळी आमदार वडेट्टीवार यांचा पुतळा जाळून निषेध करण्यात आला. वारंवार काँग्रेसचे नेते आमदार विजय वडेट्टीवार पाकिस्तानी दहशतवाद्यांना पाठीशी घालण्याचे काम करत आहेत. २६/११ च्या मुंबई हल्ल्याबाबत त्यांनी वाचाळ वक्तव्य केले होते. आता पुन्हा एकदा आमदार वडेट्टीवार यांनी पहेलगाम येथे मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांचा अपमान केला आहे. या प्रकरणी भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते आक्रमक झाले होते.

या आंदोलनाप्रसंगी भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेश पदाधिकारी प्रा. प्रकाश बगमारे, भाजपा महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा सौ. वंदना शेंडे, भाजपा शहर अध्यक्ष अरविंद

(उर्वरित पान क्र. ६ वर)

## गरीब रुग्णांसाठी धर्मदाय रुग्णालयात खाटा राखीव!
### रूग्ण लाभ कां घेत नाही, हा प्रश्न!

ब्रम्हपुरी/का.प्र.

निर्धन व दुर्बल रुग्णांना सवलतीच्या दरात उपचार देण्याच्या अनुषंगाने ब्रह्मपुरी तालुक्यात धर्मादाय रुग्णालय उपलब्ध असून त्याचे नाव ख्रिस्तानंद रूग्णालय, ब्रम्हपुरी असून आपली सेवा प्रदान करीत आहेत. ब्रह्मपुरी तालुक्यात एक धर्मादाय रुग्णालय आहे. त्यात बऱ्याच राखीव खाटा आहेत. असे असूनही धर्मादाय रुग्णालयात पाहिजे त्या प्रमाणात रुग्ण उपचारासाठी येत नसल्याचे वास्तव आहे.

पुण्यातील दीनानाथ मंगेशकर धर्मादाय रुग्णालयाच्या हलगर्जीमुळे एका गर्भवती महिलेला प्राण गमवावे लागले. या घटनेनंतर धर्मादाय रुग्णालयातील सेवेचा प्रश्न ऐरणीवर आला. ब्रह्मपुरी तालुक्यात एक धर्मादाय रुग्णालय उपलब्ध आहे. ब्रह्मपुरी तालुक्यातील ख्रिस्तानंद रूग्णालय ब्रह्मपुरी या धर्मादाय रुग्णालयात एकूण १२० खाटा उपलब्ध आहेत. या रुग्णालयात निर्धन व दुर्बल घटकांसाठी खाटा राखीव ठेवल्याचे दिसून येते. तालुक्यातील निर्धन रूग्णांसाठी एकूण १२ खाटा राखीव आहेत. या रुग्णालयाने दिलेल्या आरोग्य सेवांबाबत सहायक धर्मादाय आयुक्तांकडे वर्षभरात एकही तक्रार नाही. तरीसुद्धा या रुग्णालयात जाणाऱ्यांची संख्या अत्यल्प असल्याचे दिसून येते.




**सुविधा कोणाला मिळतात?**

निर्धन रुग्णांसाठी वार्षिक १ लाख ८० हजार रुपये उत्पन्न असावे. त्यांना १० खाटा राखीव आहेत. शिवाय पूर्णपणे मोफत उपचार. दुर्बल घटकातील रुग्णांसाठी ३ लाख ६० हजार उत्पन्न मर्यादा असून, १० टक्के राखीत खाटा व संपूर्ण उपचार मोफत दिला जातो. यासाठी शिधापत्रिका, दारिद्र्यरेषेखालील पत्रिका व वार्षिक उत्पन्नाचे तहसीलदारांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

**धर्मादाय रुग्णालयांत नेमक्या कुठल्या सरकारी सुविधा मिळतात?**

**मोफत उपचारांसाठी १२ खाटा राखीव** : निर्धन व दुर्बल घटकांसाठी तालुक्यात ब्रह्मपुरीच्या ख्रिस्तानंद रुग्णालयामध्ये अनुक्रमे प्रत्येकी १२ खाटा राखीव आहेत. धर्मादाय रुग्णालयात तज्ज्ञ डॉक्टरांची चमू रुग्णसेवा देण्यास तत्पर आहे.

**पाणी जपून वापरा.**






## संपादकीय...

# पाकला वठणीवर आणाच!

पहलगामच्या हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव वाढला असतानाच, जम्मू आणि काश्मीरमध्ये नियंत्रणरेषेवर काही ठिकाणी पाकिस्तानी सैन्याने गोळीबार करून, मूळ स्वभावाचे दर्शन पुन्हा घडवले. अर्थात, भारतीय लष्कराने चोख प्रत्युत्तर देऊन, मर्यादा ओलांडल्यास काय घडेल, याचे संकेत दिलेच आहेत. जम्मू-काश्मीरमध्ये बांदीपुरा येथे सुरक्षा दलाने एका दहशतवाद्यास ठार मारले, तर दोन दहशतवाद्यांची घरे उद्ध्वस्त केली. सार्क व्हिसाअंतर्गत भारतात आलेल्या सर्व पाकिस्तानी नागरिकांना शोधून, मुदत संपण्यापूर्वी त्यांची मायदेशी रवानगी करावी, अशी सूचना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना केली आहे. महाराष्ट्रात राहणाऱ्या पाक नागरिकांची यादी तयार असून, सर्व पोलिस स्थानकांना त्यांची रवानगी करण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्परतेने सूचना दिल्या. भारतातील एकूण एक पाकिस्तान्यांना येथून हाकलूनच लावले पाहिजे, हे सरकारचे धोरण सुसंगतच आहे. इतकेच नाही तर मंत्री शहा यांनी सिंधू जल करार स्थगित केल्यानंतर पाण्याचा एक थेंबही पाकिस्तानला जाऊ न देण्याचा निर्धार केंद्र सरकारने व्यक्त केला आहे. यावर सिंधू जल करार रद्द करण्याच्या भारताच्या भूमिकेने पाकिस्तान धास्तावला असून पहलगाम हल्ल्याच्या कोणत्याही निःपक्ष चौकशीत सहभागी होण्याची तयारी पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी दर्शवली आहे.

लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी जम्मू-काश्मीरमधील सुरक्षेचा आढावा घेतला. काही ठिकाणी युद्धसरावही सुरू असून, पाकिस्तानला जन्मभर लक्षात राहील, असा धडा शिकवण्याचे केंद्र सरकारने ठरवले आहे. दोन्ही देशांमधील वाढत्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, पाकिस्तानच्या संसदेने पहलगामकांडाचा संबंध पाकिस्तानशी जोडण्याचा भारताचा प्रयत्न नाकारणारा ठराव मंजूर केला. निष्पाप नागरिकांना मारणे, हे पाकने राखलेल्या मूल्यांच्या विरुद्ध असल्याचे या ठरावात म्हटलेले आहे. वास्तविक पाकिस्तानच्या स्थापनेपासून त्या देशाने भारतात वारंवार घुसखोरी करून, ठिकठिकाणी बॉम्बस्फोट घडवले. पोलिस आणि लष्करी जवानांच्या हत्या केल्या. तसेच असंख्य निष्पाप नागरिकांची हत्या केली. एकीकडे पहलगाममधील घटनेचा पाकशी काही संबंधच नाही, असा ठराव तेथील संसद मंजूर करत असतानाच, हा हल्ला करणारे लोक स्वातंत्र्यसैनिक असू शकतात, असे संतापजनक उद्गार पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री इसहाक दार यांनी काढले. भारताकडे या हल्ल्यात पाकचा सहभाग असल्याचे पुरावे असतील, तर त्याने ते जगासमोर सादर करावे, असे दार यांनी म्हटले आहे. यापूर्वी 26-11 मध्ये पाकचा हात असल्याचे पुरावे देऊनही तेथील सरकारने त्याबाबत कोणतीही कारवाई केली नाही. उलट मुंबई हल्ल्यातील दहशतवादी पाकिस्तानमध्ये मोकाटपणे फिरत आहेत. शिवाय पाकव्याप्त काश्मीरमध्ये नुकताच दहशतवाद्यांचा मेळावा झाला आणि भारतास जाहीरपणे धमक्याही देण्यात आल्या. पाकिस्तान सरकारच्या आशीर्वादाविना असा मेळावा होणे शक्य नाही. 'पाकिस्तानातील दहशतवादी संघटनांना पाठिंबा देणे, त्यांना प्रशिक्षण व निधी देणे हा आमचा प्रदीर्घ इतिहास आहे गेल्या तीन दशकांपासून अमेरिकेसाठी हे घाणेरडे काम करत आहोत', अशी कबुली पाकिस्तानचे संरक्षणमंत्री ख्वाजा आसिफ यांनीच दिल्याने पाकचा बुरखा पुन्हा एकदा फाटला.

1979 ते 1989 या दशकात सोव्हिएत सैन्य अफगाणिस्तानात असताना, बंडखोर मुजाहिद्दींना अमेरिका शस्त्रास्त्रांची मदत करत होती आणि या 'लढ्यात' पाकिस्तानी दहशतवाद्यांचा समावेश होता. सोव्हिएत रशियाने अफगाणिस्तानमधून माघार घेतल्यानंतर पाक दहशतवादी मोकळे झाले. त्यानंतरच्या काळात पाकपुरस्कृत दहशतवाद्यांनी काश्मिरात जवळपास 70 हजार लोकांच्या हत्या केल्या. या दहशतवाद्यांना प्रशिक्षण देणारी केंद्रे उद्ध्वस्त करण्याची भाषा पूर्वी भारत करत असे, तेव्हा अमेरिका सबुरीचा सल्ला देत होती. मात्र अफगाणिस्तानातील युद्ध संपल्यानंतर पाकिस्तान स्वतंत्रपणे सीमापार दहशतवादी कारवाया करू लागला. त्यामुळे या सर्व भारतविरोधी कृत्यांचे खापर अमेरिकेवर फोडून, पाकिस्तानला हात वर करता येणार नाहीत ! 29 सप्टेंबर 1981 रोजी इंडियन एअरलाईन्सचे श्रीनगरहून दिल्लीला निघालेले विमान खलिस्तानवाद्यांनी पळवून लाहोरला नेले. या अपहरणकर्त्यांना लाहोर येथील नानकाना साहिब गुरुद्वारात ठेवून, तिथून पाकिस्तानने पंजाबातील कारवाया सुरू केल्या होत्या. भिंद्रनवालेचा उदय झाल्यानंतर, पंजाबमधील खलिस्तानवाद्यांना पाकने शस्त्रास्त्रे, दारूगोळा व निधीही पुरवला. पाकचे लष्करशहा झिया-उल-हक यांनी आयएसआयमार्फत पंजाब व काश्मीरमध्ये दहशतवादाची पेरणी केली. राजीव गांधी यांनी पंतप्रधान झाल्यानंतर 'ऑपरेशन बासट्रॅक्स' हाती घेऊन, पाकिस्तानच्या सीमेलगत लष्कराच्या 10 डिव्हिजन्स आणि 3 ब्रिगेडस् आणून ठेवल्या. त्यावेळी पाकिस्तान भयभीत झाला होता. गरज पडल्यास, आम्ही अणुबॉम्बचाही वापर करू, अशी धमकी पाकिस्तानचे मुख्य अणुवैज्ञानिक अब्दुल कादिर खान यांनी दिली होती. मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यात पाकिस्तानचा हात असल्याची कबुली 2018 मध्ये माजी पंतप्रधान नवाझ शरीफ यांनी दिली होती. पाकिस्तानच्या भूमीत 30 ते 40 हजार दहशतवादी आहेत, हे 2019 मध्ये पाकिस्तानचे तत्कालीन पंतप्रधान इमान खान यांनी आपल्या अमेरिका भेटीत कबूल केले होते. पाकिस्तानमध्ये नॉन स्टेट ॲक्टर्स आहेत आणि ते भारतविरोधी कृत्यांत सामील असतात, अशी कबुली पाकचे राष्ट्राध्यक्ष झरदारी यांनी पूर्वीच दिली आहे.

अल-कायदा, लष्कर-ए-उमर, लष्कर-ए-तोयबा, जैश-ए-मोहम्मद, सिपाह-ए-साहबा, जैश-उल-अद्दल, अल-बद्र-मुजाहिद्दीन, हरकत उल-मुजाहिद्दीन आणि इसिस-केपी या दहशतवादी संघटनांच्या दृष्टीने पाकिस्तान हे सुरक्षित केंद्र आहे. पाकिस्तानच्या भूमीने लादेनलाही आसरा दिला होता. अमेरिकेच्या कळत अथवा नकळत पाकिस्तानने भारताच्या विरोधात कारस्थाने रचली आहेत. त्यामुळे मुजोर पाकिस्तान हे भारताच्या दृष्टीने शत्रूराष्ट्रच असून, त्याची मस्ती वेळीच जिरवावी लागेल. केंद्रातील सरकारला देशाचे दहशतवादविरोधी धोरण दाखवून देण्यासाठी हीच योग्य वेळ आहे.

# एलएमबी स्कुलच्या विद्यार्थ्यांचे आयएसओ परिक्षेमध्ये प्राविण्य



ब्रम्हपुरी/का.प्र.

सायन्स ऑलीम्पीआड मार्फत घेण्यात आलेल्या Inernational Social Study Olmpiad मध्ये एल.एम.बी. स्कुलच्या १८ विद्यार्थ्यांनी Gold Madel (सूवर्ण पदक) प्राप्त केले.

आजच्या स्पर्धेच्या युगात स्वत:ची ओळख निर्माण करण्यासाठी विविध स्पर्धांना समोर जावे लागते. केवळ बुध्दीच्या बळावर आपण आपले लक्ष्य साध्य केले पाहिजे, या करीता एल.एम.बी. पब्लिक स्कुल विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देण्यासाठी नेहमीच प्रयत्नाशिल असतो. International S.S.T Olympiad Exam मध्ये वर्ग ३ ते १० वी पर्यतच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून १७ विद्यार्थ्यांनी सूवर्ण पदक (Gold Medal) प्राप्त कले.

विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशानिमित्य शाळेच्या संचालिका आशिता भैया मॅडम यांनी विद्यार्थ्यांना सुवर्ण पदक व प्रमाणपत्र देवून गौरव केला. तसेच पुढील स्पर्धेकरीता स्कुलचे अध्यक्ष तथा नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैया सर, स्कुलच्या संचालिका आशिता भैया मॅडम, मुख्याध्यापक कादिर कुरेशी, उपमुख्याध्यापिका, पर्यवेक्षिका तसेच सर्व कर्मचारी वर्ग यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

# बीएसएनएल सल्लागार समितीवर दिपक ठाकरे



ब्रम्हपुरी/का.प्र.

चांद्रपुर जिल्हा बीएसएनएल दूरसंचार निगम लिमिटेडच्या सल्लागार समितीवर बोडधा येथील दिपक ठाकरे यांची निवड करण्यात आली आहे. ही निवड गडचिरोली-चिमुर लोकसभेचे खासदार डॉ. नामदेव किरसान यांच्या शिफारशीवरून केंद्रीय दूरसंचार व उत्तर पुर्व क्षेत्र विकास मंत्री ज्योदीरादित्य सिंधिया यांनी केली आहे.

दिपक ठाकरे हे बोडधा ग्रामपंचायताचे उपसरपंच असुन जिल्ह्यातील दूरसंचार सेवा आता अधिक कार्यक्षम होण्यास मदत होईल. त्यांनी आपल्या निवडीचे श्रेय खासदार डॉ.नामदेव किरसान, आमदार विजय वडेट्टीवार, गडचिरोली कांग्रेस जिल्हाध्यक्ष महेंद्र ब्राम्हणवाडे यांना दिले आहे. ग्रामीण भागात राहुन राजकिय क्षेत्रात कार्य करीत सामाजिक कार्य करणाऱ्या दिपक ठाकरे यांचे बोडधा येथील गावकऱ्यांनी त्यांच्या निवडीबद्दल अभिनंदन केले आहे.

# सहकार भारती ब्रम्हपुरी तालुका व नगर कार्यकारिणी गठित

ब्रम्हपुरी/का.प्र.

नुकतीच सहकार भारतीच्या विभाग व जिल्हा पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ब्रम्हपुरी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या सभागृहात बैठक पार पडली. यावेळी नवीन कार्यकारिणी गठीत करण्यात आली.

ब्रम्हपुरी तालुका कार्यकारीणीमध्ये अध्यक्ष पदी तुळशीदास राऊत, अनिल दोनाडकर उपाध्यक्ष, संजय मेश्राम महामंत्री, संजय लांडे सचिव, डॉ. विलास मैंद संघटन प्रमुख, अरविंद ओबोरकर तर सदस्य पदी विनायक शेन्डे, जयघोष सहारे, मंजीरी राजनकर व रश्मी रापेल्लीवार तसेच नगर कार्यकारीणी वसंत कावळे अध्यक्ष, डाकराम दोनाडकर उपाध्यक्ष, संतोष नंदुरकर महामंत्री, संदिप भानारकर सचिव, रामप्रकाश देशकर संघटन प्रमुख, पुजा कात्यायन महिला प्रमुख तर सदस्यांमध्ये मनोहर शन्डे, अल्का ढवळे, राजश्री मुंडे, अपर्णा श्रीकोंडवार, अल्का निमजे यांचा समावेश आहे. सदर निवडीची जिल्हा अध्यक्ष सतिश वासमवार हयांनी घोषणा केली.

तत्पूर्वी सहकार गीत गायनाने कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. बैठकीला विभाग सहप्रमुख विजय गोटे, ज्येष्ठ सदस्य दत्ताजी कात्यायन व सतिशजी वाससवार यांनी मार्गदर्शन केले. जिल्हा महामंत्री पुष्पा गोटे, प्रभु वाघधरे जिल्हा उपाध्यक्ष व राजेश कावलकर संघटन प्रमुख यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक व परिचय संजय मेश्राम यांनी तर आभार प्रदर्शन मंजिरी राजनकर यांनी केले.

**जल है तो कल है...**

## विनोदिनी

एक लड़की अपने बॉयफ्रेंड को अपने घर आने का रास्ता बता रही थी...
देखो, बिल्डिंग के अंदर आकर बाईं तरफ़ लिफ़्ट है...
लिफ़्ट में आकर अपनी कोहनी से ९ नम्बर का बटन दबाना... जब नौवें फ़्लोर पर आ जाओ तो राइट हैंड पर दूसरा फ़्लैट हमारा है...
यहाँ आकर अपनी कोहनी से घंटी का बटना दबाना, मैं दरवाज़ा खोल दूंगी...
बॉयफ्रेंड : लेकिन स्वीटहार्ट ये सब बटन मैं उंगली से दबाऊंगा तो ज्यादा आसानी होगी...
लड़की: ओह माई गॉड!!!...
.
.
मतलब तुम खाली हाथ आ रहे हो...?

# वाघांचा वावर असलेल्या जंगल परिसरात प्रेमीयुगुल सुसाट

## वनविभागाच्या सूचनांकडे कानाडोळा

ब्रम्हपुरी/का.प्र.

परिसरात प्रेमाची व्याख्या पार बदललेली आहे. प्रेम हे असचं असतं. करतांना ते कळतं नसतं आणि केल्यावर ते उमगतं नसतं. उमगलं तरी समजतं नसतं. पण आपलं वेड मनं आपलचं ऐकत नसते या वाक्यातून प्रेम व्यक्त होत असले तरी परिसरातील प्रेमीयुगलांचे प्रेम हे धोकादायक वळणावर आहे. आपलं न उमगलेलं नवं प्रेम व्यक्त करायला हे प्रेमीयुगल वाघांचा वावर असलेल्या जंगल परिसराचा आडोसा घेत प्रेम व्यक्त करीत आहेत. अगोदरचं वाघांचा वावर असलेल्या या जंगलात कुणी चिटपाखरूही नसतांना हे प्रेमीयुगल सुसाट वेगाने जंगल परिसरात फिरतात. अशावेळेस काही अनुचित घटना घडल्यास जबाबदार कोण? असा प्रश्न या निमित्ताने समाजातील प्रतिष्ठित विचारत आहेत.

ब्रम्हपुरी तालुक्यात वनक्षेत्र फार मोठ्या प्रमाणात आहे. त्यामध्येही या क्षेत्रातील जंगल हे झुडपी व काटेरी स्वरूपाचे आहे. झुडपी जंगल असल्यामुळे या तालुक्यात जंगल परिसरात वाघांची भिती आहे. तालुक्यात मानव-वन्यजीव संघर्षाच्या घटना या घडत असतात. जंगल शिवारात शेती असल्याने अनेक शेतकरी आपल्या प्रपंचासाठी जीव धोक्यात घालुन शेती करतात. नुकतेच आवळगांव येथे हंगामी मोहफुल गोळा करायला गेलेल्या शेतमजुरावर वाघाने हल्ला करून ठार केले. सतत घडत असलेल्या वाघाच्या हल्ल्याने नागरिक व वनविभागही हवालदिल झालेला आहे. हीच दहशत या परिसरातील जंगलात आहे. परंतु बेभान झालेले प्रेमीयुगल कुठलीही तमा न बाळगता या जंगलात प्रेम व्यक्त करायला दुचाकीवर येत असतात. अगोदरचं झुडपी जंगल असल्यामुळे बाजुला असलेला वन्यप्राणीही आपल्याला दिसत नाही. त्यातचं हे प्रेमीयुगल तासनतास जंगलात बसुन प्रेम व्यक्त करीत असतात. त्यामुळे प्रेमीयुगलांनी वाघाची भिती असलेल्या या जंगल परिसरात जाण्याचे टाळावे. सदर परिस्थितीवर मात करण्यासाठी नागरिकांनीही वनविभागाच्या सुचनांकडे कानाडोळा करू नये.

# इंग्रजी ही लोकल ते ग्लोबल भाषा - डॉ. युवराज मेश्राम

## ने.हि. महाविद्यालयातील एफडीपी कार्यक्रमात प्रतिपादन

ब्रह्मपुरी/का.प्र.

'वर्तमान जीवनात इंग्रजी भाषेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. इंग्रजी भाषा ही विविधांगी



रोजगाराचे केंद्र आहे. ही भाषा तरुणांसाठी त्यांच्या जगण्याचे साधन बनलेली आहे. जगातील वाचकांना गाजलेल्या हजारो राष्ट्रभाषा, बोलीभाषा आणि इतर भाषेतील साहित्याचे वाचन इंग्रजीमुळे शक्य झाले आहे, त्यामुळे इंग्रजी भाषा हे लोकल ते ग्लोबल भाषा केंद्र ठरते.' असे बहूमूल्य विवेचन डॉ. युवराज मेश्रामांनी केले. ते सहा दिवसीय एफडीपी कार्यक्रमात 'भाषा : वर्डवाईड इंग्लिश' या' विषयावर बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. धनराज खानोरकर होते. तर प्रमुख उपस्थितीत उपप्राचार्य डॉ. सुभाष शेकोकर, डॉ.रेखा मेश्राम, डॉ.राजेंद्र डांगे, डॉ. किशोर नाकतोडे, डॉ. रतन मेश्राम उपस्थित होते. याप्रसंगी आपल्या अध्यक्षीय मनोगतात डॉ. खानोरकरांनी, भाषा कोणतीही असो ती आपल्या जगण्याचा हुकांर असतो. इंग्रजी जगाची ज्ञानखिडकी आहे पण मातृभाषा ही आपली माय असून त्यातून आपण पूर्ण व्यक्त होतो. शेवटी व्यक्तीने बहुभाषिक होणे महत्त्वाचे असे मार्गदर्शन केले. कार्यक्रम प्राचार्य डॉ. डी. एच. गहाणे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. किशोर नाकतोडे, संचालन व आभार प्रदर्शन प्रा.जयेश हजारेंनी केले. यशस्वीतेसाठी डॉ. अरविंद मुंगोले, डॉ.भास्कर लेनगुरेंनी सहकार्य केले. कार्यक्रमाला प्राध्यापकवृंद उपस्थित होता.

# विहार मेश्राम याचे ७ कि.मी. खुल्या मॅरेथॉन स्पर्धेत उत्तम प्रदर्शन

ब्रम्हपुरी/का.प्र.




ब्रम्हपुरी येथील विहार मेश्राम याने दिनांक २७/०४/२०२५ ला सकाळी ०६.३० वाजता संत संताजी जगनाडे महाराज चौक उमरेड येथे 'ओम साई स्पोर्टिंग क्लब, उमरेड' यांच्या वतीने आयोजित मॅरेथॉन स्पर्धेत खुल्या गटामध्ये सहभाग घेत, ७ कि.मी. अंतर पार करून यश मिळवले! ही केवळ स्पर्धा नव्हती, तर स्वत:शीच केलेल्या संघर्षाची, जिद्दीची आणि चिकाटीची परीक्षा होती. त्यात तो यशस्वी झाला.

'या स्पर्धेत मी विजयी ठरलो! या प्रवासात मिळालेलं यश हे माझ्या मेहनतीचा आणि सततच्या प्रयत्नांचा गौरव आहे. ही सुरुवात आहे, अजून बरेच शिखरं सरायची आहेत! स्पर्धेतील प्रत्येक क्षणात जिद्द, तयारी आणि आत्मविश्वास यांची खरी कसोटी लागली आणि अखेर कठोर मेहनतीच्या जोरावर यशाचा झेंडा फडकावता आला. ही कामगिरी केवळ वैयक्तिक विजय नाही, तर माझ्या स्वप्नांच्या दिशेने टाकलेलं ठाम पाऊल आहे. या स्पर्धेत यश मिळवताना मिळालेली प्रेरणा आणि पाठिंबा हा पुढील वाटचालीसाठी मोठा बळ देणारा आहे,' असे तो स्पर्धेविषयी बोलतांना म्हणाला.

विहारने त्याला मार्गदर्शन करणारे लक्ष्य अकॅडमीचे संचालक प्रफुल नागपुरे सर, पीआरडी स्पोर्ट चे संचालक राहुल जुवारे सर यांचे मन:पूर्वक आभार मानले असून पुढील आव्हानांसाठी आणखी जोमाने सज्ज असल्याचे सांगितले.

# शासकीय तंत्रनिकेतन ब्रम्हपुरीच्या ७ विद्यार्थ्यांना भारत सरकारची शिष्यवृत्ती जाहीर



Gayatri Pravin Chatare | Shrunkhal H. Saijare | Vaishnavi S. Gaikwad | Shreya R. Raut | Saniya U. Narote | Ritesh D. Chacharkar | Krish D. Gohane

ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील शासकीय तंत्रनिकेतन संस्थेत शिकत असलेल्या सात विद्यार्थ्यांना भारत सरकारच्या 'प्रगती, स्वनाथ आणि सक्षम' या तीन शिष्यवृत्त्या गुणवत्तेच्या निकषावर नुकत्याच जाहीर झाल्या आहेत.

'प्रगती शिष्यवृत्ती' ही 'तंत्रशिक्षणाच्या माध्यमातून महिलांचे सबलीकरण' या उद्देशाने तंत्रशिक्षण पदविका तसेच पदवीचे शिक्षण घेत असलेल्या गुणवंत मुलींना, 'स्वनाथ शिष्यवृत्ती' ही पितृछत्र हरवलेल्या गुणवंत मुला-मुलींना तर 'सक्षम शिष्यवृत्ती' ही दिव्यांग विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या मार्फत दिल्या जातात. प्रत्येकी ५० हजार रुपयांची प्रगती शिष्यवृत्ती प्राप्त करणाऱ्या विद्यार्थीनी- इलेक्ट्रिकल इंजीनिअरिंगच्या गायत्री प्रवीण चातारे व श्रृंखल हंसराज सैजारे, कॉम्प्यूटर टेक्नोलॉजीच्या वैष्णवी संजय गायकवाड व श्रेया रामदास राऊत, सिव्हील इंजीनिअरिंगच्या सानिका उद्धव नरोटे या असून सिव्हील इंजीनिअरिंगचे विद्यार्थी क्रिश देवेंद्र गोहणे यांना सक्षम आणि मायनिंग अभियांत्रिकीचे रितेश ज्ञानेश्वर चाचरकर यांना स्वनाथ अशा प्रत्येकी ५० हजार रुपयांच्या शिष्यवृत्त्या जाहीर झाल्या आहे. या शिष्यवृत्त्या पदविकेच्या तीनही वर्षासाठी मिळतात. यासाठी प्रत्येक वर्षी संस्थेमार्फत अर्ज सादर करावा लागतो.

सदर शिष्यवृत्ती प्राप्त होण्यासाठी संस्थेचे प्र. प्राचार्य डॉ. राजन वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. मीनल मून यांनी समन्वय साधला. शिष्यवृत्ती मिळाल्याबद्दल सदर विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे डॉ. राजन वानखडे, प्र. प्राचार्य यांच्यासह विभागप्रमुख डॉ. आशिष बहेंडवार, प्रा. माधुरी नागदेवे, प्रा. जयंत बोरकर, प्रा. शालिनी खरकाटे, प्रा. हस्तीमल कुमावत, प्रा. मीनाक्षी मानलवार, प्रा. नितीन डोर्लीकर यांच्यासह सर्व अधिव्याख्याता व कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# वन नेशन, वन इलेक्शन परिषदेत ब्रम्हपुरीच्या तनय देशकर यांचा सहभाग

ब्रम्हपुरी/का.प्र.

नुकताच भारत सरकारच्या वतीने वक्फ बिलात मोठे बदल करण्यात आले.




सरकारचे पुढचे उद्दिष्ट वन नेशन, वन इलेक्शन चे आहे. संपूर्ण देशात एकाच वेळी पंचायत ते लोकसभा निवडणुका घेण्याचा सरकारचा मानस आहे. देशात विविध वेळी अनेक ठिकाणी निवडणुका पार पडतात. यामध्ये सरकार चा मोठ्या प्रमाणात खर्च होतो. या काळात आचार संहिता लागू असल्याने सर्व विकास कामे ठप्प पडतात. अधिकारी वर्ग सतत निवडणुकीच्या कामात व्यस्त असतो. यामुळे अनेक अडचणी निर्माण होतात. देशात ‘एक देश, एक निवडणूक’ कायदा लागू झाल्यास निवडणूकांवरील खर्च सरकारला कमी करता येऊ शकतो सोबतच विकास कामे जलद गतीने पूर्ण होऊ शकतात.

वन नेशन वन इलेक्शन च्या दृष्टीने सरकारने मागील काळात माजी राष्ट्रपती रामनाथ कोविद यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे. देशाचे गृह मंत्री अमित शाह या समितीचे उपाध्यक्ष असून विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांचा या समितीत समावेश आहे. या समितीच्या वतीने २३ एप्रिल २०२५ रोजी नवी दिल्ली येथे राष्ट्रीय युवा परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. नवी दिल्ली येथील डॉ. आंबेडकर इंटरनेशनल सेंटर येथे पार पडलेल्या या राष्ट्रीय युवा परिषदेत संपूर्ण देशातून निवडक युवा प्रतिनिधींना आमंत्रित करण्यात आले होते. या मध्ये महाराष्ट्र राज्याच्या वतीने ब्रह्मपुरी येथील तनय देशकर यांना राज्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली. तनय देशकर हे भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे चंद्रपूर जिल्ह्याचे सरचिटणीस असून युवा उद्योजक आहेत. मागील काही वर्षांपासून ते ब्रह्मपुरी येथील सक्रिय राजकारणात व समाजकारणात कार्यरत आहेत.

नवी दिल्ली येथे आयोजित वन नेशन, वन इलेक्शन ची राष्ट्रीय युवा परिषद भारत सरकारचे कृषी मंत्री तथा मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. तर विविध मुद्यांवर मार्गदर्शन व चर्चा करण्यासाठी भारत सरकारचे शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान व भारत सरकारचे युवक कल्याण व क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय प्रामुख्याने पूर्णवेळ या परिषदेला उपस्थित होते. नवी दिल्ली येथे आयोजित या परिषदेतील सहभागाबद्दल तनय देशकर यांचे सर्व स्तरावर अभिनंदन केले जाते आहे.

# स्पेशल स्कूल बैग लेकर जाते हैं जापानी बच्चे

ब्रम्हपुरी/का.प्र.

जब बच्चों के स्कूल या पढ़ाई की बात आती है, तब उनके स्कूल बैग का जिक्र जरूर होता है. हर किसी को उनके स्कूल बैग के



बढ़ते हुए बोझ की ही चिंता रहती है. स्कूल बैग के भारी होने का असर बच्चों के कंधों और पीठ पर भी पड़ता है. भारत में बच्चों का स्कूल बैग एक चिंता का विषय है. हालांकि, जापान ने इस मुश्किल का हल निकाल लिया है. यहां पर एक स्पेशल स्कूल बैग काफी पॉपुलर हो रहा है.

इस बैंग का नाम रैंडोसेरु है और ये सिर्फ एक बैग नहीं है बल्कि इससे एकसाथ कई परेशानियां हल हो सकती हैं. बता दें कि यह बैग जापान की संस्कृति और परंपरा से गहराई से जुड़ा हुआ है. बाकी स्कूल बैगों से अलग ये बैग लगभग ६ सालों तक चल सकता है लेकिन जापानी लोग इस ट्रेडिशनल स्कूल बैग को इतना महत्व क्यों दे रहे हैं? रैंडोसेरु बस एक ट्रेंडी स्कूल। एक्सेसरी नहीं है बल्कि इसकी शुरुआत १८६८ से १९१२ के बीच मीजी युग में हुई थी. उस समय जापान अपनी शिक्षा प्रणाली का आधुनिकीकरण कर रहा था. नीदरलैंड के सैन बैकपैक से प्रेरणा लेकर इस बैग को तैयार किया गया है. यह बैग जापान में अनुशासन, एकता और शिक्षा का प्रतीक बन गया. आज पूरे जापान में पहली कक्षा के सभी छात्रों के पास इस बैग का होना जरूरी है.

# माजी विद्यार्थी महाविद्यालयाचा गौरव

## पालक व माजी विद्यार्थी सभा : प्राचार्य डॉ. गहाणे

ब्रह्मपुरी/का.प्र.

‘ज्ञानसाधनेसाठी पुढे जाणारा विद्यार्थी आयुष्यातही सतत पुढे जातो. नेवजाबाई



हितकारणी महाविद्यालय हे विदर्भातील शिक्षणाची गंगोत्री राहिली आहे. सचिव अशोक भैयांच्या नेतृत्वाखाली ही संस्था आता अटकेपार पोहचली. लाखो विद्यार्थ्यांनी इथे येऊन शिक्षण घेतले व आज ते देशात, परदेशात मोठया पदावर कार्यरत आहेत. हे विद्यार्थी आमच्या महाविद्यालयाचा गौरव आहेत.’ असे प्रतिपादन माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी.एच. गहाणेंनी केले.


ते येथील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयातील स्व. हिरालालजी भैया सभागृहात पालक व माजी विद्यार्थी सभेत अध्यक्षीय स्थानावरुन बोलत होते. नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सक्रीय सचिव अशोक भैयांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम घेण्यात आला. विचारपीठावर उपप्राचार्य डॉ. सुभाष शेकोकर, सदस्य डॉ. धनराज खानोरकर, पर्यवेक्षक प्रा. मेजर विनोद नरड, प्रा. आनंद भोयर, डॉ. प्रकाश वट्टी, प्रा. ओजस्विनी बावनकुळे, संघटना प्रभारी डॉ. राजू आदे इ.मान्यवर उपस्थित होते. पाहुण्यांच्या हस्ते हुशार, होतकरू विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविक डॉ..राजू आदेंनी तर संचालन प्रा. मनिषा लेनगुरे व आभार प्रदर्शन प्रा. प्रियंका उइकेनी केले. सभेला पालक व माजी विद्यार्थी बहूसंख्येने उपस्थित होते.

# भारत में तैयार होगी एलव्हीएडी डिवाइस हार्ट ट्रान्सप्लांट का इंतजार होगा खत्म

ब्रम्हपुरी/का.प्र.

भारत लेफ्ट वेंट्रिकुलर असिस्ट डिवाइस (एलपीएडी) विकसित करने की योजना बना रहा है, जो हृदय को रक्त पंप करने में मदद करता है. यह डिवाइस हार्ट फैल्योर की आशंका वाले लास्ट स्टेज के रोगियों की मदद करेगा, जो डोनर हार्ट के लिए प्रतीक्षारत हैं. सरकारी अनुमानों के अनुसार हर साल भारत में लगभग ५०,००० रोगियों को हृदय प्रत्यारोपण की आवश्यकता होती है, लेकिन डोनर हार्ट की कमी के कारण केवल २०० ऐसे ऑपरेशन किए जाते हैं. यही नहीं, हृदय प्रत्यारोपण के लिए औसत प्रतीक्षा समय लगभग ३६ महीने है. इसके अलावा आयातित एलबीएडी की कीमत ७० लाख से १ करोड़ रुपये के बीच पड़ती है. सर्जरी और ट्रांसप्लांट के बाद की देखभाल से




जुड़े खर्च अलग से हैं. स्वदेशी रूप से विकसित एलबीएडी आयातित मशीनों पर निर्भरता कम करेगा और भारत में ऐसे रोगियों के लिए हृदय प्रत्यारोपण की लागत कम होगी. परियोजना के अनुसंधान और परीक्षण के लिए करीब १०० करोड़ रुपये की जरूरत होगी.

**मिशन पेपर सब्मिट :** विज्ञान एवं प्रौद्योगिकी विभाग को सौंपे गए स्वदेशी रूप से विकसित ‘कृत्रिम मानव हृदय’ के विकास और व्यावसायीकरण पर २०२४ नीति आयोग मिलन पेपर में परियोजना के मार्गदर्शन और समय पर पूरा करने के लिए एक व्यापक समिति की स्थापना का सुराव गया है. इस समिति के पास प्रस्तावों को मंजूरी देने और प्रगति निगरानी करने की लिए एक मिशन निदेशालय की स्थापना का भी प्रस्ताव रखा गया है.

**५ वर्ष का समय :** थिंक टँक नीति आयोग का अनुमान है कि आवश्यक मंजूरी मिलने के बाद एलवी को विकसित करने में साल से अधिक का समय लग सकता है. रिपोर्ट में कहा गया है कि कानपूर, खड़गपूर और दिल्ली आईआईटी के साथ ही श्री चित्रा इंस्टीट्यूट ऑफ मेडिकल साइंसेस एंड टेक्नोलॉजी, कम लागत वाले एलवीएडी और ‘संपूर्ण कृत्रिम हृदय’ विकसित करने के विभिन्न चरणों में हैं, जो अंतिम चरण के हार्ट फैल्यौर से पीड़ित व्यक्तियों को उपचार प्रदान कर सकते हैं.

# वादळ व गारपीटीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान



ब्रम्हपुरी/का.प्र.

रविवार व सोमवार या दोन दिवस झालेल्या वादळ, गारासह पावसामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले असून यामुळे अनेक झाडे रस्त्यावर कोसळल्याने वाहतूक ठप्प झाली होती. तसेच परिसरातील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे.

दि.२७ व २८ एप्रिलला सायंकाळी ब्रह्मपुरी तालुक्यातील भालेश्वर, अऱ्हेरनवरगांव, पिंपळगांव (भोसले) येथे वादळी वाऱ्यासह गारांचा पाऊस झाला. यामुळे रस्त्यावर अनेक झाडे पडून काही तास वाहतूक ठप्प झाली. तसेच आलेल्या तुफानी वादळामुळे उन्हाळी धान पिक भूईसपाट झाले. यामुळे शेतकऱ्यांच्या तोंडचे धान पीक निसर्गाने हिरावून नेले आणि त्यांचे कंबरडे मोडले. सोबतच परिसरातील आंबे, चिक्कु व अनेक फळझाडांची पडझड झाल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

**वाचाल तर वाचाल..**

# ने.हि. महाविद्यालयात मुलींना मोफत सायकल वितरण



ब्रम्हपुरी/का.प्र.

स्थानिक नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात मानव विकास योजनेअंतर्गत प्राप्त निधितून महाविद्यालयातर्फे विद्यार्थीनींना सत्र २०२४-२०२५ मध्ये ७५ सायकलचे वितरण करण्यात आले.

सायकल वितरण सोहळयाप्रसंगी संस्थेचे सचिव अशोकजी भैया, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी.एच. गहाणे, उपप्राचार्य डॉ. सुभाष शेकोकर सर, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. आनंद भोयर सर, कनिष्ठ महाविद्यालयाचे डायरेक्टर विनोद नरड सर, वरिष्ठ लिपीक शशिकांत माडे, गोपाल करंबे यांचेसह शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

❁❁❁❁❁❁

# प्रमोद चिमूरकर यांच्या वाढदिवसानिमित्य स्पर्धा परिक्षा व गुणवंतांचा सत्कार सोहळा संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

चंद्रपूर जिल्हा परिषदेचे माजी सदस्य आणि ब्रम्हपुरी अखिल कुणबी समाज मंडळाचे उपाध्यक्ष प्रमोद चिमुरकर यांनी समाजहितासाठी विधायक उपक्रम राबवून एक वेगळाच आदर्श निर्माण केला आहे.



प्रमोद चिमुरकर यांच्या वाढदिवसानिमित्त प्रमोदभाऊ चिमुरकर मित्र परिवार व आर.डब्ल्यु. अकॅडमी, ब्रम्हपुरी यांच्या संयुक्त विद्यमाने राजीव गांधी सभागृह, ब्रम्हपुरी येथे स्पर्धा परीक्षा व गुणवंतांचा सत्कार सोहळा पार पडला. या उपक्रमात विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी, त्यांचा सन्मान व्हावा आणि स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी दिशा मिळावी, हा उद्देश ठेवण्यात आला. या कार्यक्रमाला मार्गदर्शक म्हणून सेवानिवृत्त प्राचार्य भाऊराव राऊत, गिरीश बुराडे, योगेश मिसार, उमेश धोटे (सरपंच चौगान), वकार खान, वासुदेव सोंदरकर, अमित कन्नाके, सुहास कटकमवार, सुरज मेश्राम, सुरज तलमले, पत्रकार संतोष पिलारे, होमराज लोनबले, दीपक मेहर, विलास दुपारे, सुधीर शिवरकर, मनोहर सहारे, सुरज शिवनर, चुनी नागमोती यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

याप्रसंगी स्पर्धा परीक्षेत प्रावीण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. मोहित गावतुरे यांनी प्रथम क्रमांक पटकावला, गणराज दोणाडकर द्वितीय तर शालिंद्र ढोक यांनी तृतीय क्रमांक पटकावला. त्याचबरोबर गुणवंत विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे संचालन सुरज मेश्राम यांनी तर आभारप्रदर्शन होमराज लोनबले यांनी केले. याप्रसंगी परिसरातील विद्यार्थी, पालक, मित्रपरिवार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

❁❁❁❁❁❁

# ने.हि. विद्यालयाच्या पारस टिकलेचे शिष्यवृत्ती परिक्षेत गौरवपूर्ण यश

ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील नेवजाबाई हितकारिणी विद्यालय तथा उच्च माध्यमिक विद्यालय, ब्रह्मपुरी



येथील इयत्ता पाचवीतील विद्यार्थी पारस टिकले याने महाराष्ट्र शासन आयोजित शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन करून विद्यालयाचा नावलौकिक वाढविला आहे.


पारस टिकले हा अत्यंत हुशार व परिश्रमी विद्यार्थी असून, याआधीही त्याने नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत पात्रता मिळवली होती. त्याने अपार मेहनत, सातत्यपूर्ण अभ्यास व शिक्षकांचे मार्गदर्शन यांच्या जोरावर हे यश मिळवले आहे. पारसच्या या उल्लेखनीय कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

त्याच्या या यशानिमित्ताने संस्थेचे सचिव अशोकजी भैय्या, मुख्याध्यापक ने.एम. नाईक सर, उपमुख्याध्यापक ए. डब्ल्यू. नाकाडे सर, पर्यवेक्षक पी.आर. जीभकाटे सर तसेच सर्व शिक्षक वृंद यांनी त्याचे हार्दिक अभिनंदन केले आहे व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. पारसने आपल्या यशाचे श्रेय आई-वडिलांचे प्रेमळ सहकार्य आणि शिक्षकांचे प्रभावी मार्गदर्शन यांना दिले आहे. त्याच्या यशामुळे विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी उदाहरण निर्माण झाले आहे.

# सिध्दी जयंत पराते हिचे सुयश

ब्रम्हपुरी/का.प्र.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने आयोजित इयत्ता पाचवीच्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा नुकताच निकाल जाहीर झाला



असून, ब्रम्हपुरी तालुक्यातील ख्रिस्तानंद स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजची विद्यार्थिनी कु. सिद्धी जयंत पराते हिने उल्लेखनीय यश मिळवत शिष्यवृत्तीसाठी पात्रता प्राप्त केली आहे.

कु. सिद्धीचे वडील नेवाजाबाई हितकारिणी विद्यालय, ब्रम्हपुरी येथे शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे सिद्धीचा भाऊ वेदांत पराते यानेही इयत्ता पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत गुणवत्ता यादीत स्थान मिळवले होते. सिद्धीच्या या उल्लेखनिय यशाबद्दल सर्व स्तरांतून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

**... QUOTES ...**

**"Success isn't just about what you accomplish in your life. It's about what you inspire others to do."**

**- Unknown**

**चारोळी**

*दिल्लीत बसले मनमोहन तरी*
*देशाची परिस्थिती केविलवाणी...*
*दिल्लीत बसली सोनिया तरी,*
*देशाहाती कथलाचा वाळा नाही...*

★ रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल ★

# एलएमबी स्कुलच्या विद्यार्थ्यांचे एकलव्य ज्ञानवर्धिनी सामान्यज्ञान स्पर्धा परिक्षेत प्राविण्य

ब्रम्हपुरी/का.प्र.

एल.एम.बी. पब्लिक स्कुलमध्ये प्रत्येकवर्षी एकलव्य ज्ञानवर्धिनी सामान्य ज्ञान स्पर्धा नागपुर व्दारा परीक्षेचे आयोजन



केले जाते. या वर्षी पण ही परीक्षा घेण्यात आली. या परिक्षेचा एकच उद्देश आहे तो म्हणजे 'शिका आणि मोठे व्हा'. परिक्षेचे स्वरूप असे असते की प्रश्नपत्रिके सोबत उत्तर पत्रिका विद्यार्थ्यांना दिली जाते. विद्यार्थी ती सोडवून शिक्षकांकडे सादर करतात. यातून विद्यार्थ्यांमध्ये वाचण्याची व उत्तरे शोधून लिहिण्याची वृत्ती वाढीस लागते.

या परिक्षेमध्ये इयत्ता ५ ते १० च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यामधून बहुतांश विद्यार्थ्यांनी प्राविण्य प्राप्त केले. इयत्ता ५ वी तील ऐश्वर्य मुंगमोडे हा विद्यार्थी प्रथम आला. व्दितीय श्रेया ठावरी, तृतीय श्लोक बोरकर तर चौथ्या क्रमांकावर नव्या तुपटे ही आली. इयत्ता ६ ते ७ मधील प्रथम क्रमांक लावण्या लाडे, व्दितीय आयुषी वानखडे, तृतीय कलश प्रधान आणि चौथ्या क्रमांकावर शुभ्रा नाकाडे, अनुष्का दोनाडकर, समन्वी डहारे यांनी संपादित केला. इयत्ता ८ ते १० मधील प्रथम क्रमांक तनिष्क धोंडाने, व्दितीय क्रमांकावर सोहम आखाडे व आदित्य मेंढे, तृतीय क्रमांकावर शुभम कोवे, श्रेया आंबोरकर, जोषा भरे हे होते.

प्रथम आणि व्दितीय क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना स्कुलच्या संचालिका आशिता भैया मॅडम यांचे हस्ते शिल्ड व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले तर तृतीय आणि चौथ्या क्रमांकावर आलेल्या विद्यार्थ्यांना GK पुस्तक देऊन सन्मानित करण्यात आले. पुढील स्पर्धेकरिता स्कुलचे अध्यक्ष तथा नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोक भैया सर, संचालिका अशिता भैया मॅडम, मुख्याध्यापक कादर कुरेशी, उपमुख्ध्याध्यापिका, पर्यवेक्षिका तसेच सर्व कर्मचारी वर्ग यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

❋❋❋❋❋❋

# चौगानच्या सुपुत्राचा एमपीएससीमधून यशस्वी प्रवास

## विकीकुमार दाणी लिपीक पदावर नियुक्त

ब्रम्हपुरी/का.प्र.

जिद्द, सातत्य आणि परिश्रम या त्रिसूत्रीचा आधार घेत चौगान गावचा सुपुत्र आणि गावाचा अभिमान, विकीकुमार अंताराम दाणी याने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (श्इएण) माध्यमातून त्याची विभागीय सह-निबंधक, सहकारी संस्था कार्यालय, नागपूर विभाग येथे लिपिक पदावर निवड झाली आहे.



विकीकुमारच्या या यशामुळे चौगान गावात आनंदाची लहर पसरली असून, गावकऱ्यांनी त्याचे भरभरून अभिनंदन केले आहे. त्याचा हा प्रवास अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरणारा आहे. त्याने सिद्ध केले आहे की चिकाटी, निष्ठा आणि कठोर परिश्रमांमुळे कोणतेही उद्दिष्ट गाठता येते.

चौगान गाव हे सर्वाधिक कर्मचारी, सैनिक, उच्चशिक्षित नागरिक आणि सामाजिक चैतन्यामुळे प्रसिद्ध आहे. सुमारे ११ वर्षांपूर्वी गावातील तरुणांनी एकत्र येत किरायाच्या खोलीत 'महात्मा फुले स्पर्धा परीक्षा अभ्यास केंद्र' सुरू केले. हे केंद्र २४ तास खुले असून, आज त्यातून घडलेले विद्यार्थी विविध शासकीय आणि निमशासकीय पदांवर कार्यरत आहेत – प्राथमिक शिक्षक, भारतीय सेना, अग्निवीर, पेंड्स, आरोग्य विभाग, मंत्रालय लिपिक इत्यादी आहेत.

विकीकुमार दाणी यानेही याच अभ्यास केंद्रातून प्राथमिक तयारी करत त्याचे शिक्षण पूर्ण करत स्पर्धा परीक्षेला सामोरे जाण्याचा निर्णय घेतला. लहानपणापासूनच जिद्दी आणि ध्येयवेडा असलेला विकीकुमार हा गायनाचीही आवड बाळगतो. शालेय जीवनात त्याने विविध स्पर्धांमध्ये भाग घेतला होता. घराजवळ असलेल्या अभ्यासिकेमुळे विकीकुमारच्या मनात स्पर्धा परीक्षेबाबत आवड निर्माण झाली. त्याने पदवीचे शिक्षण घेत असतानाच परीक्षेची तयारी सुरू ठेवली. सातत्यपूर्ण मेहनतीमुळे त्याने आज हे यश गाठले आहे.'स्वप्न सत्यात उतरवणारा एक प्रयत्नशील युवक' अशी ओळख निर्माण करणाऱ्या विकीकुमार दाणी याला पुढील यशस्वी वाटचालीसाठी चौगान ग्रामस्थांकडून मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या जात आहेत.



Miracle Residency
◆ Full Furnished ◆ Semi Furnished
आमचे येथे नियोजित व NATP प्लॉट्स तसेच
फ्लॅट्स खरेदी विक्रीचे व्यवहार केले जातात.
रोड APProach नियोजित व NATP Layout
रो-हाऊस - 3 bhk & 2 bhk
उराडे ले-आऊटच्या बाजूला
गट नं. 113/114
18 M. WIDE DP ROAD
MINI BUNGLOWS
त्वरा करा... बुकींग चालू आहे...
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
- कार्यालय पत्ता -
मिरॅकल कन्स्ट्रक्शन ॲण्ड डेव्हलपर्स
बस स्टॅण्डजवळ, पिसे कॉम्प्लेक्स,
पहिला मजला, ब्रम्हपुरी





प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स
गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.

# आम. वडेट्टीवारांच्या वादग्रस्त विधानाच्या...

(पान क्र. १ वरून)

नंदूरकर, तालुका अध्यक्ष प्राचार्य अरुण शेंडे, माजी नगरसेवक तथा तालुका महामंत्री मनोज वठे, जिल्हा सचिव साकेत भानारकर, शहर महामंत्री मनोज भूपाल, महामंत्री ज्ञानेश्वर दिवटे, भाजयुमो जिल्हा सरचिटणीस तनय देशकर, भाजयुमो शहर अध्यक्ष प्रा. सुयोग बाळबुधे, तालुका अध्यक्ष अविनाश मस्के, न.प चे माजी बांधकाम सभापती विलास विखार, भाजपा महिला मोर्चा शहर अध्यक्षा सौ. वर्षा चौधरी, गोपाल कावळे, पवन जयस्वाल, स्वप्नील अलगदेवे, दत्ता येरावार, प्रमोद ढाल, माजी जि. प सदस्य शंकरदादा सातपुते, ओबीसी मोर्चा शहर अध्यक्ष प्रा. अशोक सलोटकर, महामंत्री राजू भागवत, महामंत्री प्रा. दिलीप जुमडे, महिला मोर्चा जिल्हा उपाध्यक्षा सौ. मंजिरी राजणकर, प्रकाश लोखंडे, विनायक दुपारे, माजी उपसभापती नामदेव लांजेवार, सुरेश दर्वे, प्रा. संजय लांबे, ललित उरकुडे, विपुल मेश्राम, किशोर बावनकुळे, अनिल गराडे, राजू चौधरी, सौ. कुंभारे, सौ. झोडे, सौ. विभा सुभेदार, सौ. गीता जांभुळे, सौ. जोशी यांच्या सह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

❋❋❋❋❋❋

- ब्रम्हपुरी समाचारमध्ये जाहिरात प्रसिध्दीसाठी संपर्क करा -
महेश पिलारे मो. 9503100964
प्रा. विजय मुडे सर मो. 8275715315

बुधवार बंद
- दुकानाची वेळ -
सकाळी १० ते सायं. ६ वा.
Lubi PUMPS • MOTORS
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
Kirloskar
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता

Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404